I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 305-308
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# चंद्रपूर जिल्हातील स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता योजना– रोजगार निर्मिती साधन

डि. एन. मोहितकर
महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय, बल्लारपूर
*Corresponding Author: diwakar1979m@gmail.com

| Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023<br>Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023 |
|---|---|---|

**सारांश :–**

मागील काही वर्षापासून उद्योजकतेचे वारे चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागात वाहायला लागले. नोकरीच्या मागे वळणारा तरुण व्यवसायाचा विचार करायला लागला. उद्योगांच्या बाबतीत शहरी किंवा ग्रामीण यात भेद राहीलेला नाही. समस्या व गरजा दोघांच्याही समान आहेत. या गरजा व समस्या निर्मूलन करण्यासाठी सर्वप्रथम ''स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना'' अंमलात आली. या योजनेची अंमलबजावणी करतांना गरीब व्यक्तीच्या क्षमतेचा विकास, कौशल्य विकास, कर्ज, विपणन आणि पायाभूत सहायतेवर विशेष भर देऊन रोजगार निर्मिती करण्याचा प्रयत्न यात करण्यात आला आहे. याचे अध्ययण या शोधनिबंधात केले आहे.

त्यानंतर ही योजना ''राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान'' मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय केंद्रशासनाने घेतला आहे. या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून दारिद्रय कमी करण्याचा प्रयत्न झाला.

याच योजनेला ''दिनदयाल उपाध्याय अंत्योदय योजना'' मध्ये रूपांतर करण्यात आले. या योजनेच्या माध्यमातून कौशल्य विकास व इतर उपायांच्या माध्यमातून जीवन जगण्याच्या पध्दतीमध्ये वाढ करून शहरी व ग्रामीण गरिबी कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

पुढे या योजनेला ''स्टार्ट अप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रम'' हि योजना केंद्र सरकारने सुरू केली एखादा देश प्रगत होण्यामागे त्याची उद्योगवृत्ती आणि उद्योजक विचारसरणी कारणीभूत असते.

हे लक्षात घेऊन सरकारने चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील युवकांना उद्योगाच्या संधी उपलब्ध करून दिल्या यामुळे बेरोजगाराचा प्रश्न काही प्रमाणात कमी होताना दिसून येत आहे.

'स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता योजना' हा केंद्र सरकारचा एक उपक्रम आहे. ज्याचा उद्देश रोजगार आणि संपत्ती निर्माण करणे हा आहे. स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता उदिष्ट भारतातील रोजगार वाढवताना उत्पादने आणि सेवा विकसीत करणे आणि नाविन्यपूर्ण करणे हे आहे. सरकार स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता उपक्रमाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कठोर परिश्रम करत आहे. त्यासाठी केंद्र सरकारने सरकारने १६ जानेवारी २०१६ रोजी केंद्र सरकारने स्टार्टअप हि योजना अंमलात आणली.

सदर योजनेच्या आधी 'स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना' ही अस्तित्वात होती. या योजनेचे 'राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान' मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय केंद्रसरकारने घेतला आहे. सदर अभियान केंद्र शासन ७५ टक्के व राज्यशासन २५ टक्के पुरस्कृत आहे. तळागळातील गरीबांसाठी मजबूत अशा संस्थांची बांधणी करून त्याद्वारे लाभदायक स्वयंरोजगार व कुशल वेतन रोजगाराची संधी मिळविणे तसेच गरीब कुटुंबाना शक्य व्हावे व त्याद्वारे त्यांचे दारिद्रय कमी करता यावे या करीता परिणामी कायमस्वरूपी तत्वावर त्यांच्या उपजिविकेत सुधारणा करण्याचा प्रयत्न होत आहे. पुढे हिच योजना 'दिनदयाल अंत्योदय योजना' या नावाने २५ सप्टेंबर २०१४ रोजी लागू करण्यात आली. ग्रामीण व शहरी गरीबांच्या जीवन स्तरांमध्ये सुधारणा करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या साहाय्याने कौशल्य विकास आणि

इतर उपायांच्या माध्यमातून लोकांच्या जीवनात रोजगार संधीमध्ये वाढ करून शहरी आणि ग्रामीण गरिबांच्या संख्येत घट करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

वरील योजनांचा आढावा घेऊन चंद्रपूर जिल्हा ग्रामीण भागात स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण भागातील व्यवसाय, उद्योग याविषयी अधिक जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. त्यातून ग्रामीण तरूणांमध्ये उद्योगजकतेचे वातावरण तयार झाल्यास त्याचा फायदा संपूर्ण परिसराला मिळू शकतो. ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटुंबाचे जीवनमान उंचावण्याकरीता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, चंद्रपूर हा विभाग केंद्र सरकारच्या या उपयुक्त रोजगार निर्मिती योजनेच्या अंमलबजावणी करीता कार्यरत आहे.

**बीजसंज्ञा :-** ग्रामीण उद्योग, कौशल्य विकास, विपणन, रोजगार, संशोधन, अंत्योदय, स्टार्टअप.

**उद्देश:**

१. आपल्या देशातील तरूण हे खूप उत्साही आणि सक्षम आहेत, मात्र त्यांची कौशल्य उत्साह बरेचदा योग्य दिशेने जात नाही. नेमके तेच करण्याचा उद्देश या योजनेचा आहे.

२. हा एक असा उपक्रम आहे जो तरूणांना नवीन यशाची शिखर गाठण्याकरीता अशी संसाधने देईल. ज्यामुळे त्यांना त्यांचे उद्योजक बनण्याचे स्वप्न पूर्ण करता येईल. या साठी स्टार्टअप आवश्यक आहे. जेणेकरूण रोजगाराच्या चांगल्या संधी निर्माण करण्यासाठी बँका या तरूणांना वित पूरवठा करतील.

३. तरूणांना रोजगार मिळूवन देण्याचे उदिष्टे आहे जेणेकरून आपण जिल्हयातील बेरोजगारीची समस्या दूर करू शकू या उपक्रमामुळे स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता योजनेचे यश मिळण्यास मदत होईल आणि ते शेवटी त्यांची नवकल्पना आणि सृर्जनशिलता योग्य मार्गाने निर्देशित करू शकतील.

**ग्रामीण क्षेत्रात उद्योगजकतेची आवश्यकता:**

१. चंद्रपूर जिल्हयात गेल्या पाच दशकांत जे उद्योग वाढले ते शहरी भागात वाढले. त्यामुळे ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी मोठ्या प्रमाणात शहरांकडे स्थलांतर झाले आणि ग्रामीण क्षेत्रात रोजगाराच्या प्रश्नासह गरिबी कायम राहिली.

२. शेती हाच आजही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही जिल्हयातील ७५ टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत पण शेतीचे लहान लहान तुकड्यातील विभाजन आणि हवामानातील अनिश्चितते मुळे शेतीपासून पाहिजे तेवढे उत्पन्न मिळत नाही.

३. मुळात या उद्योजकतेचा हेतूच हा आहे की, जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करणे आणि ग्रामीण लोकांच्या हाताला काम देऊन पैसा आला पाहिजे.

४. ग्रामीण भागात शेतमालाची निर्मिती केली जाते परंतु कच्च्या मालाचे पक्क्या मालात रूपांतर करणारे उद्योग उभारणे आवश्यक आहे.

५. शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेती आधारीत उत्पादनांमधून येणारा पैसा थेट ग्रामीण भागात पोहचवण्याकरीताही छोट्या मोठ्या उद्योगाची आवश्यकता आहे आणि सरकारने स्टाटअप योजना आणून ग्रामीण क्षेत्रात या कार्याला सुरूवात केली.

**सरकारची महत्वाकांक्षी योजना:**

भारत सरकारने कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या विद्यमानाने उद्योजकता विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी तसेच युवक व स्त्रियांना विशेष कार्यक्रमासाठी निरनिराळे उपक्रम सुरू केले आहे. या माध्यमातून ग्रामीण गरीबांना त्यांचे उद्योग सुरू करण्यासाठी अर्थसहाय्य देऊन

त्याची गरिबी मुक्त करण्यासाठी आधार देते. स्वयंरोजगारांच्या संधी उपलब्ध करून देण्यात प्रथम प्राधान्य देण्यात येते. तसेच उद्योगांना चालना देण्यासाठी स्थानिक ग्रामीण समुदायातून नवीन युवकांना तयार करण्याचे कामही करते. व्यापार विषयक सेवा तसेच उत्पादन क्षेत्रात उभे राहणाऱ्या उद्योगासाठी बॅंकाकडून दहा लाख ते एक कोटी रूपया पर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्याचा उद्देश सदर योजनेत ठेवण्यात आला आहे. अश्या बॅंकेच्या प्रत्येक शाखेतून उद्योग सुरू करणाऱ्या अनुसुचित जातीच्या किंवा अनुसुचित जमातीच्या किमान एका उद्योगास असे कर्ज दिले जाते. तसेच सुक्ष्म, मध्यम, लघु उद्योगाकरीता प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम राबविल्या जात आहे. बिगर शेती क्षेत्रात सुक्ष्म उद्योगांची स्थापना करून स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम तयार करण्यात आला.

**उद्योजकतेतून ग्रामीण विकासाकडे:**

ग्रामीण भागासह सर्वत्र व्यवसाय, उद्योग याविषयी अधिक जागरूकता निर्माण करण्याची गरज आहे. यातून ग्रामीण तरूणांमध्ये उद्योजकतेचे वातावरण तयार झाल्यास त्याचा फायदा संपूर्ण परीसराला मिळू शकतो. ग्रामीण भागातील विविध कच्चा मालावर प्रक्रिया उद्योग उभे राहिल्यास शेतमालाला उत्तम दर मिळण्यास मदत होईल. एखाद्या देश प्रगत होण्यामागे त्याची उद्योगवृत्ती आणि उद्योजक विचारसरणी कारणीभूत असल्याचे सांगितले जाते. कारण एखाद्या मोठ्या उद्योगाने परिसरातील विविध छोट्या उद्योगांना चालना मिळते. रोजगाराची निर्मिती होते. बाजारपेठेमध्ये पैसा खेळता राहतो. स्थानिक प्रशासनाला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर मिळाल्याने अन्य पायाभूत सुविधांच्या उभारणीला चालना मिळते. एकूणच देशाच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणास मदत होते.

**ग्रामीण क्षेत्रात उद्योजकतेची संधी:**

मागील काही वर्षापासून उद्योजकतेचे अनेक संधी महारष्ट्रात प्राप्त झाल्या आहे. नोकरीच्या मागे धावणारा तरूण व्यवसायाचा विचार करतो आहे. पण त्याचवेळी या तरूणांना व्यवसायाची माहिती देणारा कुणीच भेटत नाही. व्यवसायाची सुरूवात करण्यापासून ते यशस्वीपणे चालवण्यापर्यंत सर्व क्षेत्रात अंधारातच हातपाय हलवावे लागत आहेत.

बरेचदा व्यवसायात अपयश येण्याचे मुख्य कारण असते व्यवसाय सुरू करताना चुकलेला पायऱ्या आणि व्यवसाय कसा करावा याचे अज्ञान परंतु योग्य मार्गदर्शन लाभले की, हे अपयश होण्याची शक्यता कमी असते.

चंद्रपूर जिल्हयात ग्रामीण भागात बऱ्याच संधी उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात व्यवसाय म्हटले की, डाळमिल, मसाले पापड, लोणचे उत्पादन इतकेच व्यवसाय सूचत असते. त्यापलीकडे शेकडो व्यवसाय आहे पण योग्य व्यवसाय निवडणे आवश्यक आहे.

तुम्हाला कोणत्या क्षेत्राचे ज्ञान आहे. तुमच्या परिसरातील मार्केट कसे आहे तुमचे वैयक्तिक संपर्क कसे आहेत, परिसरातील ग्राहकांची मानसिकता कशी आहे, तूमची गुंतवणूक क्षमता किती आहे, व्यवसायात कोणत्या स्तरापर्यंत वेळ आणि कष्ट देऊ शकतात, अनुभव व शिक्षण काय आहे, कोणत्या क्षेत्रात आवड आहे. इ. बाबी ध्यानात घेऊन व्यवसाय निवडायचा असतो.

**निष्कर्ष:**

१. या कार्यक्रमा अंतर्गत चंद्रपूर जिल्हयातील ग्रामीण भागातील बहुतांश उद्योगांना सरकारी मदत मिळतांना दिसत आहे.

२. सरकारच्या अनेक आणि चांगल्या योजना असल्यातरी त्याचा फायदा पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही.

३. ग्रामीण भागातील बेरोजगार तरूणांनी स्टार्टअप ग्रामीण उद्योजकता या योजनेच्या माध्यमातून प्रगती

करावी. या साठी सरकार व बँकातर्फे मेळावे आयोजीत केले जातात.

४.सरकार या योजनामार्फेत प्रोत्साहन देत आहे, प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले आहे आणि मुख्य हे उघड दिसत आहे की, कृषी आधारीत उत्पादकांना येत्या काही काळात मोठी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे एक नवीन उद्योजकता आकार घेत आहे. यावरून असे लक्षात येते की, शासकीय योजना कितीही चांगल्या असल्यातरी या योजनेचा लाभ त्यांच्या पर्यंत पाहिजे त्या प्रमाणात पोहोचत नाही. म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेत ग्रामीण भागाचा महत्वाचा वाटा असला तरी तो काही प्रमाणात उपेक्षीतच आहे हे वास्तव आहे.

**संदर्भ :–**

भारतीय वित्त व्यवस्था : डॉ. अरविंद शेंडे

आर्थिक विकास व स्वतंत्रता : अमर्त्य सेन

आर्थिक नियोजन व भारताचा विकास : डॉ. सुधीर बोधनकर

गुणात्मक संशोधनाची कार्यपध्दती : शार्लिन नॅगो

संशोधन समस्या : डॉ. सुरेश दोडके

उद्योजक मित्र

नवी अर्थ क्रांती

www.google.com